[इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीमध्ये अनुवाद]

गणेशप्रसाद बद्रीनारायण लाहोटी (मयत) वारसदार यांच्या मार्फत

वि.

संजीवप्रसाद जमनाप्रसाद चौरसिया आणि इतर

ऑगस्ट १६, २००४

[न्या. अरिजित पसायत आणि न्या. सी. के. ठक्कर]

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ :

कलम ११ आणि आदेश २२ नियम ३, ४ आणि ११ – अपीलाची समाप्ती - निर्णीत बाब – लागू होणे – अपील प्रलंबित असताना वादीचा मृत्यु झाला आणि वादीच्या कायदेशीर वारसांनी त्याच्या मृत्यूनंतर बऱ्याच काळानंतर त्यांची नावे त्याच्या जागी बदलण्यासाठी अर्ज दाखल केला – अपील न्यायालयाने त्याच्या कायदेशीर वारसांनी तीन अर्ज दाखल करायला हवे होते म्हणजेच (i) च्या जागी नावे देण्याबद्दल (ii) अपीलाची समाप्ती रद्द करण्यासाठी आणि (iii) विलंब माफ करण्यासाठी, या आधारावर त्यांनी दाखल केलेला अर्ज फेटाळून लावला - त्यानुसार तीन स्वतंत्र अर्ज दाखल केले - अपील न्यायालयाने ते अर्ज देखील निर्णीत बाब या आधारावर फेटाळून लावले – ची अचूकता – असा निर्णय दिला की : निर्णीत बाबीचा सिद्धांत

त्यानंतरच्या अर्जांना लागू होत नाही – त्यामुळे, अर्ज मंजूर केले जातात आणि अपील न्यायालयाला गुणवत्तेनुसार अपीलावर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले जातात.

मुदत अधिनियम, १९६३:

कलम ५ - विलंब माफी - मृत्यूचे पुरेसे कारण – अपीलकर्त्याचा मृत्यु – अपील प्रलंबित असताना - मृताच्या वकिलाने त्याला पत्र लिहिले की अपील सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते - मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसांना या पत्रावरून प्रथमच कळले की मृत व्यक्तीने अपील दाखल केले होते - त्यांनी लगेचच त्यांची नावे त्याच्या जागी दाखल करण्यासाठी अर्ज दाखल केला - अशा परिस्थितीत वारसांच्या बाजूने कोणतीही निष्क्रियता किंवा निष्काळजीपणा नव्हता – त्यामुळे, त्याच्या जागी नाव दाखल करण्याचा अर्ज मंजूर करण्यात आला.

वादी उत्तरवादी क्रमांक 1 (जमीन मालक) याने प्रतिवादी क्रमांक १ च्या विरोधात त्याच्या परवानगीशिवाय पोटभाड्याने दिल्याच्या कारणावर दावा मिळकतीचा ताबा परत मिळवण्यासाठी दावा दाखल केला. न्यायचौकशी न्यायालयाने दाव्यामध्ये हुकुमनामा पारित केला. जिल्हा न्यायालयाने अपील मंजूर केले आणि अंतरिम स्थगिती मंजूर केली. अपील प्रलंबित असताना प्रतिवादी क्रमांक १ चा मृत्यू झाला.

जेव्हा प्रतिवादी क्रमांक १ च्या वकिलाने त्याला अपील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे असे सांगणारे पत्र पाठविले केले, तेव्हा मृत प्रतिवादी क्रमांक 1 च्या वारसांना आणि कायदेशीर प्रतिनिधींना अपील प्रलंबित असल्याची माहिती प्रथमच मिळाली. त्यांनी लगेचच दिवाणी प्रक्रिया संहिता 1908 च्या आदेश 22 नियम 11 अंतर्गत त्यांची नावे त्याच्या जागी

दाखल करण्याबाबत विनंती करणारा अर्ज दाखल केला. मूळ प्रतिवादी क्रमांक 1 चा मृत्यूच्या संदर्भात आणि कायदेशीर वारसांची नावे ९० दिवसांच्या आत अभिलेखावर नोंदवण्यात अपयश या कारणांच्या आधारावर अपील मागे घेण्यास पात्र आहे असे सांगून सदर अर्जास विरोध केला.

जिल्हा न्यायालयाने त्यांच्या जागी वारसदारांची नावे दाखल करण्याचा अर्ज या आधारावर फेटाळून लावला की, अपीलची समाप्ती आणि विलंब माफी यासाठी त्यांच्या जागी नावे दाखल करण्यासाठी कोणताही स्वतंत्र अर्ज दाखल केला गेला नाही, या आधारावर अर्ज फेटाळून लावला. त्यानंतर, अपीलकर्त्यांनी (i) समाप्तीचा अर्ज रद्द करण्यासाठी आणि त्यांची नावे पक्षकार म्हणून च्या जागी दाखल करण्यासाठी (ii) विलंब माफ करण्यासाठी आणि आणि (iii) अंतरिम दिलासा देण्यासाठी, तीन अर्ज दाखल केले. विलंब माफ करण्यासाठी 'ड "हे पुरेसे कारण नसल्याचे कारण देत अपील न्यायालयाने ते अर्ज फेटाळले. अपील न्यायालयाने पुढे असा निर्णय दिला की, पूर्वीचा अर्ज फेटाळला गेल्यानंतर अपीलकर्त्यांनी दाखल केलेले त्यानंतरचे अर्ज निर्णीत बाबीने प्रतिबंधित केले होते.

उच्च न्यायालयाने अपीलकर्त्यांनी दाखल केलेली पुनरीक्षण याचिका या कारणास्तव फेटाळून लावली की विलंब माफ करण्यासाठी कोणतेही वाजवी स्पष्टीकरण नव्हते आणि असे की, अर्ज कायम करण्यायोग्य नव्हते. त्यामुळे याचिका दाखल करण्यात आली आहे.

अपीलकर्त्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की जिल्हा न्यायालयाने तांत्रिक दृष्टीकोन स्वीकारला आणि पूर्वीचा अर्ज फेटाळून लावला या आधारावर की, केवळ एकच अर्ज दाखल केला होता आणि की, निर्णीत बाबीचा सिद्धांत लागू होत नाही.

अपील मंजूर करताना न्यायालयाने -

निर्णय दिला की – १. खटल्याची तथ्ये आणि परिस्थिती पाहता, जेव्हा मूळ प्रतिवादीने न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेला हुकुमनामा स्वीकारला नव्हता आणि जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल केले होते जे प्रलंबित होते आणि जेव्हा अपील सुनावणीसाठी ठेवले गेले आणि वकीलांनी अपीलकर्त्यांना पत्र पाठवल्यानंतर, त्यांच्याद्वारे केल्या गेलेल्या त्वरित

हालचालीनुसार खालच्या अपील न्यायालयाने त्यांची नावे दाखल करून घेण्याची विनंती मंजूर करायला हवी होती. पूर्वीचा अर्ज फेटाळल्यानंतर, अपीलकर्त्यांनी तीन अर्ज दाखल केले होते जे प्रकरणाची एकूण आणि सौम्य परिस्थिती लक्षात घेऊन मंजूर करायला हवे होते. जेव्हा न्यायालयाला असे वाटले की, अर्ज कायम करण्यायोग्य नाहीत तेव्हा निर्णीत बाबीचा सिद्धांत लागू होऊ शकला नाही. हे अपीलकर्त्यांच्या निष्क्रियतेचे किंवा निष्काळजीपणाचे प्रकरण नाही. खालच्या अपील न्यायालयाला गुणवत्तेच्या आधारे याचिकेवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले जातात. [५९५- जी-एच; ५९६-ए-बी; ५९६-डी]

दिवाणी अपील न्यायाधिकरण - दिवाणी अपील क्र. ५२५५/२००४.

औरंगाबाद खंडपीठ कडील मुंबई उच्च न्यायनिर्णय यांनी ए.एफ.ओ. क्र. ७८/१९९९ मध्ये १८.१२.२००३ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेश यावरून.

उदय यू. ललित आणि रवींद्र केशवराव अडसुरे अपीलकर्त्यांकारिता.

मनोज स्वरूप आणि सोमीरन शर्मा उत्तरवादींकरिता.

न्यायालयाचा न्यायनिर्णय न्या. ठाकर, यांच्याद्वारे पारित करण्यात आला – अनुमती दिली.

सदरचे अपील हे  मुंबई येथील मुंबई उच्च न्यायालयाने (औरंगाबाद खंडपीठ) 18 डिसेंबर, 2003 रोजी अपीलमध्ये आदेश क्र. ७८/१९९९ मध्ये पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाच्या विरोधात दाखल केले आहे. उच्च न्यायालयाने आक्षेपित आदेशाद्वारे 13 ऑक्टोबर, 1999 रोजी जळगावच्या अतिरिक्त संयुक्त जिल्हा न्यायाधीशांनी पारित केलेल्या आदेशाला पुष्टी देऊन अपीलकर्त्याने दाखल केलेली याचिका फेटाळून लावली.

वादी- उत्तरवादी क्रमांक 1 – जमीन मालक याने दिवाणी न्यायाधीश (क. स्त.), भुसावळ यांच्या न्यायालयात प्रतिवादी क्रमांक 1 आणि 2 गणेश प्रसाद आणि भूषण बाजन यांच्याविरुद्ध नियमित दिवाणी खटला क्र. १२१/१९९१ हा दावा नगरपालिका घर क्रमांक 764 सी. टी. एस. क्रमांक 1309, गांधी स्क्वेअर, भुसावळ (संक्षिप्ततेसाठी "दाव्याची दावा मिलकत") येथील मालमत्तेचा ताबा परत घेणेसाठी या आधारावर की, जमीन मालकाला सदर जागा ही त्याच्या प्रामाणिक वापरासाठी आवश्यक आहे, तसेच मालमत्तेचा वापर बदलण्यासाठी तसेच भाडेकरूद्वारे जागेचा गैरवापर करण्यासाठी आणि प्रतिवादी क्रमांक 1 द्वारे प्रतिवादी क्रमांक 2 ला बेकायदेशीरपणे पोटभाड्याने देण्यासाठी, दाखल केला. न्यायचौकशी न्यायालयाने फेब्रुवारी १४, १९९५ च्या न्यायनिर्णय आणि हुकुमनाम्याद्वारे सदर प्रकरणामध्ये या आधारावर हुकुमनामा पारित केला की,  प्रतिवादी क्रमांक 1 ने जमीन मालकाच्या परवानगीशिवाय प्रतिवादी क्रमांक 2 ला बेकायदेशीरपणे मालमत्ता पोटभाडेतत्वाने दिली होती.

न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेल्या हुकुमनामाामुळे व्यथित झालेल्या प्रतिवादी क्रमांक 1 भाडेकरूने नियमित दिवाणी अपील क्रमांक ५१/१९९५  हे  जिल्हा न्यायाधीश, जळगाव यांच्या न्यायालयात दाखल केले. याचिका मंजूर करण्यात आली आणि अंतरिम स्थगिती देण्यात आली. मात्र, गणेश प्रसाद यांचे 4 जून, 1997 रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. 16 जुलै, 1999 रोजी किंवा त्या सुमारास, जेव्हा प्रतिवादी क्रमांक 1 चे प्रतिनिधित्व करणाऱ्या वकीलांनी पहिल्या प्रतिवादीस पत्र पाठवले की अपील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे तेव्हा अपीलकर्ते जे मयत गणेश प्रसाद यांचे वारस आणि कायदेशीर प्रतिनिधी आहेत त्यांना समजले की न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेल्या हुकुमनामााविरूद्ध मृत गणेश प्रसाद यांनी अपील दाखल केले होते आणि ते प्रलंबित होते. सबब, त्यांनी तातडीने जळगाव येथील वकीलांसोबत संपर्क साधला आणि प्रलंबित याचिकेची माहिती मागितली आणि गणेश प्रसाद यांच्या निधनाची माहिती दिली. त्यानंतर, तात्काळ दिवाणी प्रक्रिया संहिता, 1908 (यापुढे 'संहिता'म्हणून संदर्भित) च्या आदेश XXII, नियम 11 अंतर्गत 27 जुलै, 1999 रोजी दिवाणी अपील क्रमांक ५१/१९९५ मध्ये  एक अर्ज निशाणी २२ वर दाखल केला आणि त्यामध्ये मध्ये मृत-प्रतिवादी क्रमांक 1 च्या कायदेशीर प्रतिनिधींची नावे त्याच्या जागी दाखल करण्याची विनंती करण्यात आली होती. सदर अर्जाची एक प्रत प्रतिवादी जमीन मालकास देण्यात आली. मूळ प्रतिवादी गणेश प्रसादचा याचा मृत्यू आणि नव्वद दिवसांच्या आत वारसांची नावे नोंदवण्यात अपयशी ठरल्यामुळे अपील रद्दबातल होण्यास पात्र आहे असा युक्तिवाद करत उत्तरवादीने अर्जाला उत्तर दाखल केले. हे देखील सादर करण्यात आले होते की अर्जदारांनी समाप्ती रद्दबातल करण्याची कोणतीही विनंती केली नसल्यामुळे, निशाणी  22 वर दाखल अर्ज हा कायम करण्यायोग्य नव्हता. विद्वान अतिरिक्त

संयुक्त जिल्हा न्यायाधीश यांनी 26 ऑगस्ट 1999 रोजी निशाणी २२ खाली दिलेल्या आदेशाद्वारे वारसांची नावे त्यांच्या जागी दाखल करण्याचा अर्ज फेटाळून लावला इतर गोष्टींबरोबर या आधरावर की, त्या नावाच्या जागी नावे दाखल करण्यासाठी, अपिलची समाप्ती रद्दबातल करण्यासाठी तसेच विलंब माफीसाठी कोणतेही स्वतंत्र अर्ज दाखल केले गेले नाहीत.

निशाणी 22 वर दाखल असलेला अर्ज 'तांत्रिक' आधारावर फेटाळल्यानंतर, अपीलकर्त्यांनी तीन अर्ज दाखल केले ते म्हणजे (i) निशाणी 29 वर समाप्ती रद्द करण्यासाठी आणि त्यांची नावे पक्षकार म्हणून त्या नावाच्या जागी दाखल करण्यासाठी (ii) निशाणी 31 विलंब माफ करण्यासाठी; आणि (3) निशाणी 33 अंतरिम दिलासा. तथापि, विलंब माफ करण्यासाठी पुरेसे कारण दिले गेले नाही असे निरीक्षण नोंदवत अपील न्यायालयाने ते अर्ज फेटाळले. हे देखील आढळून आले की पूर्वीचा निशाणी 22 वर असलेला अर्ज फेटाळण्यात आला आणि त्यामुळे अपीलकर्त्यांनी दाखल केलेले अर्ज निर्णीत बाबीच्या सिद्धांताने रोधित केले गेले.

सदर आदेशामुळे व्यथित होवून अपीलकर्त्याने दिवाणी पुनरीक्षण अर्ज क्रमांक १२०७/१९९९ दाखल करून उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांनीही सदर अपील फेटाळून लावले आणि असे निरीक्षण नोंदविले की, दोन वर्षांनंतर अपील समाप्तीकरिता अर्ज दाखल करण्यात आला आणि विलंब माफ करण्यासाठी कोणतेही वाजवी स्पष्टीकरण सादर केलेले नव्हते. उच्च न्यायालयाने असेही निरीक्षण नोंदवले की जेव्हा एखादा अर्ज यापूर्वी करण्यात आला होता आणि तो फेटाळण्यात आला होता, तेव्हा

याचिकाकर्त्यांनी तोच मुद्दा पुन्हा उपस्थित करणे योग्य नव्हते आणि त्यामुळे अर्ज स्वीकारण्यायोग्य नव्हते. हा तोच आदेश आहे ज्याला त्यांनी आमच्यासमोर आव्हान दिले.

आम्ही पक्षकारांचे वकिलांचे म्हणणे ऐकले आहे. भाडेकरूविरुद्ध हुकुमनामा मंजूर झाल्यानंतर त्याने जिल्हा न्यायालय जळगाव येथे अपील दाखल करून अपील मंचाकडे धाव घेतली होती असा युक्तिवाद अपीलकर्त्यांच्या वकिलांनी केला. त्यामुळे हे स्पष्ट होते की भाडेकरूने न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेला हुकुमनामा स्वीकारला नव्हता. अपील न्यायालयाने अपील मंजूर केले होते आणि अंतरिम दिलासा देखील दिला होता. यातील अपीलकर्त्याना त्यांच्या वडिलांनी दाखल केलेल्या सदर अपील बाबत माहिती नव्हती आणि त्यामुळे ते मयत गणेश प्रसाद यांच्या वतीने उपस्थित असणाऱ्या वकीलांच्या निदर्शनास ही वस्तुस्थिती आणू शकले नाहीत. जुलै, 1999 मध्ये जेव्हा जळगाव येथील वकीलांचे मृत प्रतिवादीस पत्र लिहिले तेव्हा हे प्रकरण सुनावणीसाठी ठेवण्यात आले होते तेव्हा अपीलकर्त्यांना जिल्हा न्यायालयासमोर अपील प्रलंबित असल्याची माहिती मिळाली. सबब त्यांनी ताबडतोब वकीलांशी संपर्क साधला आणि त्यांना गणेश प्रसाद यांच्या निधनाची माहिती दिली आणि निशाणी 22 वर अर्ज दाखल केला. खालच्या अपील न्यायालयाने दुर्दैवाने तांत्रिक दृष्टीकोन स्वीकारला आणि केवळ एक अर्ज दाखल केला होता या आधारावर अर्ज फेटाळला. विलंबासाठी कोणतेही वाजवी स्पष्टीकरण नसल्याचे हे निरीक्षण नोंदवण्यात देखील न्यायालय योग्य नव्हते. जेव्हा अपीलकर्त्यांना जळगाव येथील प्रलंबित कार्यवाहीची माहिती नव्हती तेव्हा ते मृत गणेश प्रसाद यांच्या मृत्यूनंतर लगेचच अर्ज करू शकले नाहीत. प्रथमच, त्यांना अपील प्रलंबित असल्याची माहिती तेव्हा मिळाली जेव्हा त्यांना त्या वकीलांचे पत्र मिळाले ज्याच्या माध्यमातून मृत-प्रतिवादी यांनी जिल्हा न्यायालय जळगाव येथे अपील दाखल

केले होते. त्यानंतर अपीलकर्त्यांच्या बाजूने कोणताही विलंब झाला नाही. सबब कनिष्ठ अपील न्यायालयाने हा अर्ज मंजूर करायला हवा होता.

असेही सांगण्यात आले की, निशाणी 22 वर असलेला अर्ज फेटाळल्यानंतर, तेथे विविध दिलासे मिळवण्यासाठी वेगवेगळे प्रार्थना करणारे विविध अर्ज केले गेले. जोपर्यंत, विलंबाच्या अर्जाचा संबंध आहे तेथे आधीच सांगितल्याप्रमाणे अपीलकर्त्यांनी परिस्थिती स्पष्ट केली होती ज्यामध्ये मृत गणेश प्रसाद यांच्या मृत्यूनंतर लगेचच अर्ज करता आले नाहीत. अशा प्रकारे विलंब माफ करण्यासाठी आणि पक्षकारांचा त्यांच्या जागी नावे दाखल करण्याचा अर्ज मंजूर करण्यासाठी पुरेसे कारण होते. वकिलाने पुढे सादर केले की, निर्णीत बाबीच्या सिद्धांताने अर्जांना रोधित केल्याचे निरीक्षण नोंदवीणे देखील न्यायालयाचे योग्य नव्हते. निर्णीत बाबीचा सिद्धांत अशा स्थितिला लागू होणार नाही. उच्च न्यायालयानेही आदेशावरून अपील फेटाळण्यात हीच चूक केली होती. सबब, अशी विनंती करण्यात आली की, निशाणी 29, 31 आणि 33 वर दाखल असेलेले अर्ज मंजूर करण्यात यावेत तसेच अपील न्यायालय तसेच उच्च न्यायालय यांनी पारित केलेले आदेश रद्दबातल करावेत आणि अपील न्यायालयाला कायद्यानुसार अपीलावर निर्णय घेण्यासाठी योग्य निर्देश दिले जावे.

दुसरीकडे, प्रतिवादींच्या विद्वान वकिलाने खालच्या अपील न्यायालयाने पारित केलेल्या आणि उच्च न्यायालयाने पुष्टी दिलेल्या आदेशाला पाठिंबा दिला. जिल्हा न्यायालयासमोर अपील प्रलंबित असल्याबद्दल अपीलकर्त्यांच्या बाजूने माहिती नसल्याबाबत खालच्या अपील न्यायालयाला काहीही दाखवले गेले नाही आणि म्हणूनच न्यायालयाने असा निर्णय दिला की, विलंब माफ करण्यासाठी कोणतेही वाजवी स्पष्टीकरण नाही. निशाणी 29, निशाणी 31 आणि

निशाणी 33 च्या अर्जाच्या संदर्भात वकिलाने सादर केले की न्यायालयाने ते अर्ज गुणवत्तेच्या आधारावर आणि निर्णीत बाबीच्या सिद्धांताच्या आधारावरही फेटाळणे योग्य होते याचे कारण म्हणजे पूर्वीचा अर्ज जो निशाणी 22 वर होता तो गुणवत्तेच्या आधारावर फेटाळण्यात आला होता. वकिलाने असेही सादर केले की उच्च न्यायालयाने अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेल्या युक्तिवादांचा पुन्हा विचार केला आहे आणि कायम करण्याच्या आणि गुणवत्तेच्या आधारावर अपील फेटाळले आहे.अशाप्रकारे घटनेच्या अनुच्छेद 136 अंतर्गत विवेकाधीन अधिकारक्षेत्रात या न्यायालयाच्या हस्तक्षेपासाठी कोणतेही प्रकरण उरत नाही. वकिलाने असेही सादर केले की, न्यायचौकशी न्यायालयाने पोटभाड्याने देण्याच्या आधारावर हुकुमनामा पारित केला असल्याने गुणवत्तेच्या आधारावरही अपील मंजूर करण्यास पात्र नाही. भाडेकरूने घरमालकाच्या परवानगीशिवाय दावा परिसर पोट-भाड्याने दिला होता आणि अशा प्रकारे त्याने नफ्याचा व्यवसाय सुरू केला होता.

पक्षकारांच्या विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकल्यानंतर, आमच्या मते, अपील मंजूर होण्यास पात्र आहेत. प्रतिवादीविरुद्ध हुकुमनामा पारित करण्याच्या कारणाचा संबंध आहे तोवर आम्ही हे स्पष्ट करू शकतो की आम्ही त्या मुद्दयावर कोणतेही मत व्यक्त करत नाही आणि जेव्हा हे प्रकरण सुनावणीसाठी येईल तेव्हा न्यायालय गुणवत्तेनुसार योग्य आदेश देईल. परंतु आमच्या मते, खटल्याच्या तथ्यांमध्ये आणि परिस्थितीत, जेव्हा मूळ प्रतिवादीने न्यायचौकशी न्यायालयाने पारित केलेला हुकुमनामा स्वीकारला नाही आणि जिल्हा न्यायालयासमोर अपील दाखल केले होते, जे प्रलंबित होते आणि ज्यावेळी अपील सुनावणीसाठी ठेवण्यात आले त्यावेळी वकीलांनी अपीलकर्त्यांना पत्र पाठवले आणि तेव्हा त्यांनी त्वरित कारवाई केली, तेव्हा खालच्या अपील न्यायालयाने नावे दाखल करण्याची

विनंती मंजूर करायला हवी होती. आमचे असेही मत आहे की, निशाणी 22 वर दाखल असलेला अर्ज फेटाळल्यानंतर अपीलकर्त्यांनी निशाणी 29, निशाणी 31 आणि निशाणी 33 असे  तीन अर्ज दाखल केले होते ज्यामध्ये प्रकरणाची एकूण आणि क्षीण करणारी परिस्थिती लक्षात घेऊन परवानगी द्यायला हवी होती. जेव्हा न्यायालयाला असे वाटले की अर्ज कायम राखण्यायोग्य नाहीत तेव्हा निर्णीत बाबीचा सिद्धांत लागू होऊ शकला नाही. आमच्या विचारानुसार, हे अपीलकर्त्यांच्या निष्क्रियतेचे किंवा निष्काळजीपणाचे प्रकरण नाही.

वर नमूद केलेल्या कारणांवरून, आमच्या मते अपील मंजूर करण्यास पात्र आहे आणि त्यानुसार मंजूर केले जाते. 13 ऑक्टोबर, 1999 रोजी अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, जळगाव यांनी पारित केलेला आदेश आणि 18 डिसेंबर, 2003 रोजी उच्च न्यायालयाने पुष्टी दिलेला आदेश रदद्बातल करण्यात आला आहे आणि अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तथ्ये आणि परिस्थितीमध्ये, अपीलकर्ते खर्चाच्या स्वरूपात रुपये 10,000/- (दहा हजार रुपये फक्त) हे वादी- उत्तरवादी क्रमांक 1 ला अदा करतील. सदरची रक्कम आजपासून तीन महिन्यांच्या कालावधीत भरली जावी. त्यानंतर कनिष्ठ अपील न्यायालय गुणवत्तेनुसार याचिकेवर सुनावणी घेतील आणि 31 ऑगस्ट, 2005 रोजी किंवा त्यापूर्वी कायद्यानुसार निर्णय देतील. त्यानुसार, वर

दर्शविलेल्या मर्यादेपर्यंत अपील मंजूर करण्यात येत आहे.

व्ही.एस.एस                                                                अपील मंजूर केले.

**x-x-x-x-x-x**

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x-x-x**